# प्रकरण ५

# उपसंहार

'स्त्री' जन्मत नाही, ती घडविली जाते. या संदर्भात सिमॉन-द-बोव्हा ला 'बाईपण' अभिप्रेत आहे. ज्या शारीरिक भेदामुळे स्त्री व पुरुष वेगळे मानले जातात. त्या शारीरिक भेदाला स्त्रीचा दुबळेपणा समजणे व वरील व्याख्येप्रमाणे तिचे 'बाईपण' अधोरेखित करण्याचे साचे बनविण्याचे काम हे पितृसत्ताक, पुरुषकेंद्र व्यवस्थाच करते. हा लिंगभान मग स्त्रीचे भागधेय बनतो. म्हणूनच बोव्हा म्हणते की, "A Woman is not born, She is made" किंवा "One is not born, But rather becomes, a woman" या सत्याची जाणीव जेव्हा स्त्रीला होते तेव्हा ती आपले अस्तित्त्व शोधण्याचा प्रयत्न करु लागते, तेथून मग स्त्रीवादाला सुरुवात होते.

पुरुषसत्ताक समाजामुळे स्त्रीच्या वाट्याला आलेले दुय्यमस्थान नाकारून माणूसपणाचा क्षमताधिष्टित हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली राजकीय चळवळ हे 'स्त्रीवादाचे' सर्वसाधारण स्वरुप आहे. डॉ. उषा देशमुख म्हणतात की, ''स्त्रीच्या विशिष्ट अनुभव शरीर आणि मानसिक दृष्ट्या पृथगात्मक ठरतात, स्त्रियांची परवशता आणि होणारा कोंडमारा, तिचे दुय्यमत्त्व आणि शोषणात्मकता यांची सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय समज आजच्या स्त्रीला येऊ लागल्यामुळे तिने बंडखोरी करण्याचा पवित्रा घेतला. स्त्रीनिष्ठ अनुभवांचे प्रगटीकरण म्हणजे स्त्रीवाद असे म्हणता येईल.''

'स्त्रीवाद' ही एक स्थल-कालानुरूप बदलत्या वास्तवानुसार बदलत जाणारी संकल्पना असून १९६० नंतर पाश्चात्त्य देशाकडून ती भारतात आयात झाली. त्याचा प्रभाव अनेक गोष्टींवर पडला तसेच मराठी साहित्यावर देखील पडला. आपल्या जीवनातील प्रश्न, दु:ख आपले माणुसकीहीन अस्तित्त्व, वैचारिक भावनात्मक नैतिक मर्यादा यामागे असलेले पुरुषी राजकारण, अनुभव, भावना, वेदना हे मांडण्यासाठी स्त्रियांनी अनेक वाङ्मयप्रकाराचा उपयोग केला. पण स्त्रियांना सर्वात जवळचा वाटणारा वाङ्मयप्रकार म्हणजे आत्मकथन आपले मनोगत व्यक्त करण्याचा या वाङ्मयप्रकाराचा आवाका व्यापक असल्याने लेखिकेला आपले विस्तारलेले भावविश्व उलगडून सांगण्यास खूपच मदत झाली आहे.

सुमा करंदीकर यांनी 'रास' या पुस्तकात स्वत:चे जीवनदर्शन घडविले आहे. विंदाच्या साहित्य संसाराला आपल्या संसाराचा एक भाग मानणाऱ्या सुमा करंदीकरांची समन्वयी भूमिका यातून दिसून येते. त्यात त्यांच्या काळातील स्त्रीचे दर्शन प्रांजलपणे घडविले आहे.

सुमांबाईनी चार पिढ्यातील स्त्रीचे दर्शन घडविले आहे. त्यापैकी आजी, आई, सासू, याच रुपात सोशिक स्त्रीचे चित्रण केले आहे. स्वत: विंदानी आपल्यावर केलेल्या कृपेची जाण ठेवून काहीशा दबलेल्या अवस्थेत आपली भूमिका त्या बजावत राहतात. यातून लेखिकेच्या या अनुभवातच तिच्या मनावर पूर्वसंस्कार किती खोलवर आहेत ते जाणवते. पण त्यांची चौथी पिढी म्हणजे मुलगी आणि सून सुशिक्षित पिढी असल्याने स्त्री ही स्त्री आहे हे वेगळेपण त्यांच्या शिक्षणातून व्यवसायातून आणि दृष्टीकोनातून स्पष्ट होते. स्वत:चा पती स्वत: निवडणारी त्याची कन्या. तसेच सूनबाई नीलम गोऱ्हे स्त्री आधारकेंद्रात कार्य करणारी, स्त्रीमुक्ती चळवळीत देश-विदेशात परिषदा, परिसंवादात भाग घेणारी नवी पिढी ही यातून दिसते.

चार पिढ्यांच्या वैचारिक फरकातून 'रास' मधून त्या त्या काळातील स्त्रीचे सुख दु:ख स्पष्ट होते आणि स्त्रीवादी संकल्पनेच्या दृष्टीकोनातून लेखिकेच्या मागच्या दोन आणि पुढची एक पिढी कशी वाटचाल करीत आहे हे जाणवते. या सर्वांचा अत्यंत अलिप्त आणि तटस्थ वृत्तीने सुमा करंदीकरांनी वेध घेतलेला आहे.

'आहे मनोहर तरी गमते उदास' असे म्हणत सुनीताबाई आपले जीवन सर्वांपुढे मांडतात. आपलं जीवन-आपलं सहचरीपण पुलंच्या असाधारण प्रतिभेमुळे आणि प्रतिमेमुळे बाह्यदर्शनी खूप मनोहर वाटत असलं, तरी प्रत्यक्षात ते उदास करणारं आहे. हा भाव या आत्मपरलेखनातून व्यक्त होतो. या लेखनातून त्या पुरुषप्रधान व्यवस्था आणि तिचंच अपत्य असणारी लग्नसंस्था स्त्रीला पुरेसा न्याय देऊ शकत नाही, त्या तीन पायांच्या शर्यतीत स्त्रीची सतत फरफट होते, तिच्या भावना-संवेदना डावलल्या जातात. त्यामुळे तिच्या मनात वैफल्य, निराशा येते आणि वरकरणी 'मनोहर' वाटणारं तिचं जीवन तिला अंतर्यामी उदास करुन जातं हे दाखवतात.

स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाची चीड त्या व्यक्त करताना दिसतात. आजीवर होणाऱ्या अन्यायविरूद्ध आवाज उठवणाऱ्या सुनीताबाई नंतर मात्र स्वत: पुलंच्यासंसारात गुरफटत जातात. त्यांचा मूलपणा, स्वार्थीपणा आणि आत्मकेंद्रीपणा सहन करताना दिसतात. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या सुनीताबाई "सर्व मोडा, तोडा, बाहेर पडा." म्हणणाऱ्या सुनीताबाई आज काहीही मोडू नये, तुटू नये याची खबरदारी घेत घराच्या चार भिंतीत स्वत:ला कोंडून घेतात. या त्याच्या लेखनातून त्याच्याठायी असणारा तटस्थपणा, सत्यता, काहीही न लपविण्याची वृत्ती तसेच आत्मपरीक्षण दिसून येते. हे लिखाण करताना त्यांनी ते स्त्रीवादी भूमिकेतून केले नसले तरी यामध्ये स्त्रीवादाला अनुरूप मुद्दे सापडतात.

सुमा करंदीकर आणि सुनीताबाई या दोघींही जरी प्रसिद्ध साहित्यिकांच्या पत्नी असल्या तरी त्यांना स्वतंत्र अस्तित्त्व आहे हे त्यांनी आपल्या लेखनातून सिद्ध कले आहे. त्या दोघीही कोणत्याही बाबतीत आपल्या पतीपेक्षा कमी नाहीत पण एकीने पतीचा मूलपणा सांभाळला तर दुसरीने पतीचा आक्रस्ताळी स्वभाव सहन केला.

दोघींनी आपल्या लेखनातून स्त्री स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य याविषयी आपली मते मांडली आहेत. सुमाबाई नोकरी करणाऱ्या व नोकरी न करता नुसते गृहिणीपद भूषविणाऱ्या स्त्रियांना हक्काची जाणीव करुन देताना दिसतात. तसेच सुनीताबाई 'Down with the kitchen' बायकांनी घराबाहेर पडले पाहिजे. स्वंयपाकघरात स्वत:ला कोंडून घेण्याची गुलामगिरी आता बस्स असे म्हणताना दिसतात. पण दोघींही नंतर गृहिणीपद सांभाळून स्वत:ला आपल्या पतीच्या कौटुंबिक आणि साहित्यिक संसारात बांधून घेतात. या दोघींमध्ये साम्य आहे तसेच भेद आहेत. सुमा करंदीकर आपले अनुभव, मते सांगताना विंदाच्या प्रतिष्ठेच्या विचार करताना दिसतात. पण सुनीताबाईचा पिंडच मूळात बंडखोरीचा असल्याने त्या आपले अनुभव, मते तसेच पतीचे दोष ही दाखवताना कोणताही पुढचा मागचा विचार करत नाहीत. स्त्रीवादी विचारधारेत स्त्रियांच्या साचेबंद भूमिका तपासण्याचं काम चळवळीने खूप जोरात केले. स्त्री आणि संसार याचे नाते सर्व बाजूनी तपासले गेले. स्त्रीनं संसार करणं ही समाजमान्य परंपरा असल्यामुळे संसार करणं ही वैयक्तीक निवड होऊ शकत नाही.

परंपरेने स्त्रीपुरुषाकडे चालत आलेली भूमिका स्वीकारणे हे स्वातंत्र्याचं उदाहरण होऊ शकत नाही. कारण त्यामागे कोणताही संघर्ष नाही. स्वातंत्र्यापेक्षा समर्पणाची आणि त्यातून हाती येणाऱ्या हौतात्म्या ची गरज लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक प्रिय असल्याचं भासतं.

सर्व मोडा, तोडा बाहेर पडा म्हणणाऱ्या सुनीताबाई स्वत:ला मात्र 'Down with the kitchen' या चौकटीत बंदिस्त करुन घेतात त्यांना स्वत:ला परस्परविरोधी भासणाऱ्या दोन भूमिकांत कोणताही अंतर्गत विरोध किंवा विसंगती वाटत नाही. स्त्रीला कोणतेही काम मग ते स्वंयपाक असो वा दुसे कोणतेही काम, बंधन कुणावरही असू नये, स्वंयपाकघराचा तुरुंग होऊ नये, हाच त्या 'मोडा-तोडा' चा अर्थ त्यांना अपेक्षित आहे. संसारात आयुष्य घालविणे, ही निवड लेखिकेला (सुनीताबाईंना) आपल्या स्वातंत्र्याचे प्रतीक वाटते. पण सुमाबाईंना मात्र काही कारणास्तव या आयुष्याला शरण जावे लागते. अत्यंत प्रेमाने आणि निगुतीने नवऱ्याचा संसार करणाऱ्या बायका आपण पाहिलेल्या आहेत. त्यापैकी एक सुमाबाई. त्यांना फारशी घराबाहेरची बोलावणीही येत नाहीत. त्या विंदांच्या मित्राशी फोनवर बोलताना ही घाबरतात. पण नवऱ्याच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून कार्यरत राहणे, नवऱ्याचा साहित्यिक संसार सांभाळणे, त्यांना व मुलांना खाऊ-पिऊ घालणे यातच स्वत:च्या जीवनाचं सार्थक मानतात. त्या पूर्व संस्कारामुळे, आपल्यावर केलेल्या कृपेमुळेच विंदांचा संसार सुखाने करुन त्यांना शरण जातात. पतीच्या संसाराला हातभार लावून ही त्यांच खास कौतुक व्हायला हवं तितकं होत नसतं आणि त्याची मनाला खंत वाटते.

लेखिकेच्या सर्व महत्त्वाच्या निर्णयाचं प्रयोजन एक तर बंडखोरी किंवा त्याग. पण सुनीताबाईच्या संसारामध्ये पतीच्या समजूतदारपणामुळे बंडखोरीला वावच नव्हता म्हणून मग त्याग. तर सुमाबाईंना पतीच्या संतापी, आक्रस्ताळेपणामुळे बंडखोरी करताच आली नाही म्हणून त्याग त्यांचे भागधेय बनला.

कोणत्याही स्त्रीची स्त्रीवादापर्यंत ज्या टप्प्यांनी उत्क्रांती होते. त्याच्या नेमका उलट या दोन्ही लेखिकांचा प्रवास आहे. स्त्रीवादात स्त्रीला प्रथम आपण जगत असलेल्या आयुष्यात आपल्यावर व्यक्ती म्हणून अन्यायाची जाणीव होऊ लागते. मग या अन्यायांचा अर्थ

समजावून घ्यायचा की नाही हा तिचा पहिला निर्णय, मग समजावून घेतल्यानंतर तिच्या असं लक्षात येते की, हे अन्याय एक व्यक्ती (तिचा नवरा) दुसऱ्या व्यक्तीवर (तिच्या स्वत:वर) करत नसून, त्यातला पुरुष ह्य समाजघटक स्त्री ह्या समाजघटकावर करीत आहे. त्याला विरोध करायचा की नाही हा दुसरा महत्त्वाचा निर्णय. विरोध करायचाच ठरलं की मग तो सर्वसामान्य गृहिणी म्हणून जिची सुरुवात झाली ती हळूहळू बंडखोर होत जाते. पण तिच्या बंडाचा पाया पक्का असतो. त्यात तिच्या पिंडाचा वगैरे भाग नसतो. मग अगदी सौम्य स्वभावाची स्त्रीसुद्धा बंड करु लागते. जसे बंड सुमाबाई करताना दिसतात. कधी कधी विंदाच्या बोलण्याच्या अतिरेकामुळे सुमाबाई त्यांना प्रत्युत्तर देताना दिसतात. एका सामान्य गृहिणीपासून बंडखोरवृत्ती पर्यंत त्यांचा प्रवास दिसतो. असे असले तरी ती बंडखोरवृत्ती काही प्रमाणातच दिसून येते. याउलट 'आहे मनोहर तरी'.... च्या लेखिकेचा प्रवास बंडापासून परंपरागत निर्णयाने सर्व रेशीमीधागे सोडवून मोकळी होण्यापर्यंत पोहचलेला आहे. या प्रवासात लेखिकेने पुन्हा पुन्हा सांगितलेला आनंद न दिसता तिचा एकाकीपणाच प्रकर्षाने जाणवितो. अपेक्षाभंग, मनातल्या बारीक बारीक वेदना आणि मनाला सतत सतावणारे प्रश्न याची गोळाबेरीज निराशाजनक वाटते. शांता गोखले म्हणतात, ''स्त्रीवादाचा पाया आशावाद हा आहे. फोल आशावाद नाही, तर मानवशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास या सर्वांच्या अभ्यासावर अधारित आशावाद. म्हणूनच एक अत्यंत टोकाचा केस-स्टडी. यापलीकडे स्त्रीवादास 'आहे मनोहर तरी' मध्ये ठोस असे काही सापडत नाही. पण या पुस्तकातील ओळीओळीमधील आणि शब्दाशब्दामधील जागा जेव्हा मानसशास्त्र भरून काढील, तेव्हा एक गुणी, कर्तबगार, करारी स्त्रीच्या अंतर आणि बाह्य रंगांचं जे रूप प्रकट होईल, ते मात्र संवेदनशील मनुष्यस्वभावात रस असलेल्या वाचकास खूप काही देईल. कारण यापुस्तकात दडलेलं एक दुसरं पुस्तक आहे ते म्हणजे पु.ल. देशपांडे ह्यांची स्वैर भटकंती.

तसेच काही 'रास' या आत्मकथनाच्या बाबतीत घडते. सुमा करंदीकर या विंदांशी संसार करताना स्वत:ला पूर्णपणे त्या संसाराशी एकरुप करुन त्या संसारात वाहून घेतात.

म्हणून लेखिका ही पती आणि कुटुंबातील मुले त्यांच्या चांगल्या वागणुकीचे प्रतीक आहे. 'रास' कडे स्त्रीवादी साहित्य म्हणून पाहताना सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा लागतो. स्वत:चे स्वत्त्व जपून पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध बंडखोरी करताना त्या दिसत नाहीत. किंबहुना प्रेमळ वृत्तीने समंजस स्त्री अशी त्यांची प्रतिमा 'रास' मध्ये उमटते.

स्त्रीवादी म्हणजे 'स्त्री' एक व्यक्ती म्हणून स्वत:च्या अस्तित्त्वाची जाण, आत्मभान येणे म्हणण्यास हरकत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवरील ही संकल्पना भारतात रुढ झाली असली तरी अजून देखील स्त्रीला एक माणूस म्हणून मान्यता नाकरलेली दिसून येते. मराठीतील जेष्ठ कवयित्री पद्‌माबाई गोळे या आपल्या एका कवितेतून स्त्रीजीवनाचे विदारक सत्य मांडतात. त्या म्हणतात,

''स्त्री देवी हे तर खोटे.
स्त्री सखी हे ही खोटं
स्त्री सुंदर चलनी हुंडी
स्त्री म्हणजे नुसती कुंडी
स्त्री म्हणजे केवळ मांस
शिकाऱ्याच्या हातात फास
बाकी सारे मोहक भास''

(पद्‌माबाई गोळे)

आज २१ व्या शतकात समाजामध्ये स्त्रीचं स्थान काय ? हा प्रश्न न कळत मनात उमटत राहतो. ज्या समाजात एकीकडे तिला देवी म्हणून गौरविले जात असताना दूसरीकडे तिच्या शरीराची विटंबना केली जाते. तेव्हा ती एक हक्काची वस्तू बनून राहते. पतीच्या दृष्टीने ती चलनी हुंडी असते. पण सखी मात्र ती होत नाही. सुमाबाई आणि सुनीताबाई या दोघींच्याही नशीबी हेच आले. त्या आपल्या साहित्यिक पतींच्या मैत्रिणी होऊ शकल्या नाहीत. स्त्रीला असणारी शोभेच्या वस्तूची किंमत जराही कुठे कमी झालेली दिसत नाही. स्त्री ही एखाद्या जनावराप्रमाणे नवऱ्याच्या मालकीची असते जसे शिकाऱ्याच्या हातात

असणारे अश्राप सावज, आणि स्त्रीची समाजापुढे जी प्रतिमा निर्माण केली जाते ती तर फक्त एका मोहक भासासारखीच.

स्त्री समोरही हे चिरंतन मोहक भास त्याच शक्तीने उभे केलेले दिसतात. विविध क्षेत्रामध्ये उच्चस्तरीय कर्तृत्व दाखविणाऱ्या स्त्रियांचीही यातून सूटका नाही. अर्थात संपूर्ण जगाच्या पार्श्वभूमीवर भारतासारख्या पोथीनिष्ठ व धर्मनिष्ठ समाजजीवनामध्ये हे आजही प्रकर्षाने जाणवणारे ज्वलंत सत्य आहे. धर्माचा असणारा जबरदस्त पगडा, पुरुषी वर्चस्वाची मक्तेदारी, आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव आणि रूढी, परंपराचे मनोमन पालन करण्याची परंपरानिष्ठ मनोभूमिका यामुळे आजही भारतीय स्त्रीच्या स्वतंत्र्य व्यक्तिमत्त्वाला खीळ बसली आहे. हे जरी खरे असले तरी या सर्वावर मात करुन स्त्री आपले स्वत्त्व आणि अस्तित्त्व जपताना आज ही दिसत आहे.